महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५६९/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७२ दि. १६/ ०८/ २०१८

**विषय :** महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांना दि. ०१ जानेवारी, २०१७ ते दि. ३१ जानेवारी, २०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत.

**संदर्भ :** १) सा.आ.क्र. ११७ (क) दि. ३१/०३/१९८६.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६४ दि. ०५.१०.२०१७
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६९ दि. १७.०३.२०१८.

...............

महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्र. मभवा-२०१७/प्र.क्र.११/सेवा-९ दि. २१.०९.२०१७ च्या धर्तीवर म.रा.वि.वितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६४ दि. ०५.१०.२०१७ अन्वये वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या १३६ % या दराने महागाई भत्ता दि. ०१.०१.२०१७ पासून लागू करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्र. मभवा-२०१७/प्र.क्र.११/सेवा-९ दि. २८.०२.२०१८ च्या धर्तीवर म.रा.वि.वितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय परिपत्रक क्र. ५६९ दि. १७.०३.२०१८ अनुसार वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या १३९ % या दराने महागाई भत्ता दि. ०१.०७.२०१७ पासून लागू करण्यात आला आहे. सदर प्रशासकीय परिपत्रकान्वये दि. ०१.०१.२०१७ ते दि. ३१.०१.२०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्याबाबतच्याही सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत.

२. या संदर्भात वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून पारित झालेल्या शासन निर्णय क्र. मभवा-२०१७/ प्र.क्र.११/सेवा-९ दि. ०६.०८.२०१८ अन्वये राज्य शासकीय कर्मचारी तसेच ज्यांना महागाई भत्ता अनुज्ञेय आहे अशा इतर पात्र पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दि. ०१ जानेवारी, २०१७ ते दि. ३१ जुलै, २०१७ आणि दि. ०१ जुलै, २०१७ ते दि. ३१ जानेवारी, २०१८ या चौदा महिन्यांच्या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत.

३. आता, शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना दि. ०१ जानेवारी, २०१७ ते दि. ३१ जुलै, २०१७ आणि दि. ०१ जुलै, २०१७ ते दि. ३१ जानेवारी, २०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वाणिज्य) यांच्याशी विचार विनिमय करून मंजुरी प्रदान केली आहे.

४. या अनुषंगाने परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दि. ०१ जानेवारी, २०१७ ते दि. ३१ जुलै, २०१७ आणि दि. ०१ जुलै, २०१७ ते दि. ३१ जानेवारी, २०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम महावितरण कंपनीमधील कर्मचाऱ्यांना माहे ऑगस्ट २०१८ च्या वेतनासोबत अदा करण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

१६/८

( संदेश हाके )
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)